तहसिलदार, कागल. सत्यमेव जयते जि.कोल्हापूर.

क्र. गुंठेवारी/एस.आर/९४५/२०१३
तहसिलदार कार्यालय, कागल
दि. १४/२/२०१३

**विषय :** **मौजे क।। सांगाव**, ता. कागल येथील रि.स.नं./गट नं. **३७४** मधील **प्लॉट नं. ३५२** क्षेत्र **२०७.१५ चौ.मीटर** ची गुंठेवारी अकृषिक आकारणीबाबत.

**वाचले :** १) अर्जदार **श्री. नारायण आप्पाजी हजारे, रा. क।। सांगाव, ता. कागल, जि. कोल्हापूर** यांचा दि. २२-०१-२०१३ चा अर्ज.

२) मा. जिल्हाधिकारीसो, कोल्हापूर यांचेकडील आदेश क्र. कार्यासन ३/आरआरसी/३५०/२००३ दि. ३०-०४-२००३

३) ग्रामपंचायत **क।। सांगाव** यांचेकडील नियमधिन परवाना क्र. **१३/२७** दि. **२८-१२-२०१२** चे गुंठेवारी नियमितीकरण केलेले प्रमाणपत्र व मंजूर नकाशा.

४) महाराष्ट्र गुंठेवारी विकास अध्यादेश २००१ मधील नियम ५(१)

५) महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ मधील कलम ४७, ६७, ११३ व ११४ तसेच (जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम १९६९ मधील नियम १८.

६) शासन परिपत्रक क्र. एनएए १००५/प्र.क्र. २१६/ल-५, दि. १९ सप्टेंबर २००६

६) अर्जदार यांनी प्रकरणातील दिलेली माहिती व कागदपत्र सत्य असलेबाबत दि. **३१-०८-२०१२** रोजी केलेले प्रतिज्ञापत्र.

## आदेश

**श्री. नारायण आप्पाजी हजारे, रा. क।। सांगाव, ता. कागल, जि. कोल्हापूर** यांनी **मौजे क।। सांगाव**, ता. कागल येथील रि.स.नं./गट नं. **३७४** मधील **प्लॉट नं. ३५२** क्षेत्र **२०७.१५ चौ.मीटर** या भूखंडाची निवासी कारणासाठी गुंठेवारीची अकृषिक आकारणी भरून घेणेबाबत इकडे अर्ज केलेला आहे.

सदरचा भुखंड सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम २७ विवक्षीत गुंठेवारी विकासाचे नियमितकरणा अन्वये सदरचे क्षेत्र ग्रामपंचायत हद्दीत येत असल्याने वरील क्षेत्राचे गुंठेवारी नियमितीकरण प्रमाणपत्र ग्रामपंचायत **क।। सांगाव**, ता. कागल यांनी दिलेले आहे. सदर जागेचा प्रति चौ.मी. ०.१० पैसे प्रमाणे अकृषिक सारा + रुपांतरीत कर ५ पट + जि.प. ग्रा.पं. चे ८ पट + मोजणी फी. रु. **५००/-** अशी मिळून एकूण रक्कम रु. **१०२५/-** अर्जदार यांनी सदर आदेश दिले तारखे पासून ६ महिनेचे आत शासकीय खजीन्यात जमा करणेचे आहे.

महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ व त्या खालील नियमांच्या तरतुदीस आधीन राहून खालील अटीवर निवासी कारणासाठी अकृषिक आकारणी वसुलीस परवानगी देणेत येत आहे.

१) प्रस्तुत क्षेत्राच्या भूखंडाचा वापर फक्त निवासी कारणासाठी करणेचा आहे. अन्य कारणासाठी करणेचा झालेस इकडील पुर्व परवानगी घेणेची आहे.

२) अर्जदार या आदेशाच्या तारखेपासून शासनाने विहित केलेल्या प्रती चौ.मी. ला रु. ०.१० या दराने अकृषिक आकारणी व त्यावरील उपकर दरसाल भरेल.

३) दि. १-८-२००६ पासून अकृषिक आकारणीच्या दरामध्ये सुधारणा केली असून त्यास वाचले क्र. ५ नुसार स्थगिती आलेने पुर्वीच्या दराने आकारणी केलेली आहे. पुढील आदेशानंतर जे दर निश्चित होतील ते दर अंमलात राहतील.

४) अर्जदार ग्रामपंचायत **क।। सांगाव** यांचेकडून इमारत बांधकाम आराखडा मंजूर करून घेईल.

५) अर्जदार बांधकाम सुरू करण्यापूर्वी संबंधित उपअधिक्षक भूमिअभिलेख कागल यांचेकडून रेखांकनाचे मोजमाप करून घेईल आणि जागेवर चिन्हांकीत करणेत येईल.

६) सदर जमिन सार्वजनिक प्रयोजनासाठी भुसंपादनास पात्र राहील.

७) अर्जदार यांना महाराष्ट्र जमिन महसूल (जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी नियम १९६९) ला जोडलेल्या चार/पाच मध्ये असलेल्या नमुण्यामध्ये जमिनीच्या अकृषिक वापरास प्रारंभ करणेच्या संबंधातील सर्व शर्ती सनदेमध्ये विनिर्दिष्ट करून सनद देणे हे बंधनकारक असेल.

८) अर्जदाराने या आदेशात नमूद केलेल्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास या संहितेच्या तरतुदी अन्वये उक्त शर्तीस तो पात्र असेल अशा इतर कोणत्याही शर्तीस बाधा न आणता तहसिलदार कागल निर्देश देतील अशा दंडाची आणि आकारणीच्या रक्कमेचा भरणा केल्यानंतर उपरोक्त अधिनियमाच्या उक्त जमिन अर्जदाराच्या ताब्यात असल्याचे चालू राहील.

९) अर्जदार यांने सक्षम अधिकारी यांचेकडून रितसर परवानगी घेवून, सदर भूखंडावर बांधकाम करणेचे आहे.

अर्जदारांनी पुरविलेली माहिती व कागदपत्रे चुकीची अथवा दिशाभूल करणारी आढळल्यास सदरचा आदेश रद्द करण्यात येईल. तसेच सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २७ विवक्षित गुंठेवारी विकासाचे नियमितीकरण व श्रेणी वाढ करणे तसेच गुंठेवारी विकास नियमित करणे आणि त्या संबंधित बाबीसाठी करणेत आलेला अधिनियम विशेषत: अधिनियमातील कलम ५ पोट कलम १ मधील तरतुदीस आधिन राहून अकृषिक आकारणीचा आदेश रद्दबातल करणेस पात्र राहील.

तहसिलदार, कागल. सत्यमेव जयते जि.कोल्हापूर.

**तहसिलदार कागल**

प्रती

**श्री. नारायण आप्पाजी हजारे,**
रा. क।। सांगाव, ता. कागल, जि. कोल्हापूर

प्रत

१) ग्रामपंचायत **क।। सांगाव, ता. कागल** यांना पुढील कार्यवाहीसाठी.

२) उपअधिक्षक, भूमि अभिलेख, कागल
यांचेकडे मंजूर रेखांकनाची व मोजणी फी मूळ चलनाच्या प्रतिसह पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

३) गा.का. तलाठी **क।। सांगाव, ता. कागल**

२/- सदर आदेशाची नोंद गा.न.नं. २ ला घेणेत यावी व अर्जदाराकडून दरसाल अकृषिक सारा वसूल करावा.

**तहसिलदार कागल**